# प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) : नागरिकांच्या माहितीसाठी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), पुणे अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या गावांसाठी प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) शासन निर्णय दि. ८-१२-२०१७ अन्वये अंमलबजावणी करण्यास मान्यता प्राप्त झाली असून या योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व प्रभावीपणे करण्यासाठी पीएमआरडीए तर्फे विविध संकल्पना रुजविण्यात येत आहेत.यात प्रामुख्याने क्रेडीट लिंक्ड सबसिडी स्कीम (सिएलएसएस) अंतर्गत जास्तीतजास्त लाभार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी:

१) बँक आणि क्रेडाई सोबत बैठकांचे आयोजन करण्यात आले.

२) खाजगी विकासकांकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांची महत्त्वपूर्ण माहिती क्रेडाई कडून गोळा करण्यात आली आहे.

३) पीएमआरडीए च्या संकेतस्थळावर प्रधानमंत्री आवास योजनेसाठी स्वतंत्र पोर्टल तसेच या योजनेचे अर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

४) पीएमआरडीए कार्यालायात नागरीकांसाठी स्वतंत्र मदत कक्षाची स्थापना करण्यात आली असून लाभार्थी, बँक प्रतिनिधी, व खाजगी विकासकांना माहितीसाठी दि.२२ जाने २०१८ रोजी पंडित भीमसेन जोशी सभागृहात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**गृह निर्माण विभाग- शासन निर्णय जाने. २०१७**. नुकताच निर्गमित झाला असून या शासननिर्णयात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सार्वजनिक भागिदारी (पीपीपी) तत्त्वावरील प्रकल्पासाठी केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या प्रतिकृतीची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्याबाबत थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे:

एसएलएसएमसी: राज्यस्तरीय मान्यता व नियंत्रण समिती मुख्य सचिवयांच्या अध्यक्षतेखाली स्थापित करण्यात आली असून या समितीचे सी.इ.ओ म्हाडा उपाध्यक्ष आहेत.

डीएमए: नगरपालिका प्रशासन संचालनालय - सुकाणू अभिकरण

**सार्वजनिक जमिनीवर राबवायचे प्रकल्पासाठी - ६ प्रतिकृती**
**खासगी जमिनीवर - २ प्रतिकृती**

**सार्वजनिक जमीन:**

**मॉडेल-१:** शासकीय जमिनीवर अनुदानित गृहनिर्माण खासगी विकासनास प्राधिकरण नाममात्र दराने दीर्घ मुदतीकरिता भाडे पद्धतीने भूखंड उपलब्ध करून दिला जाईल.

**मॉडेल-२:** विकासकास परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी सार्वजनिक प्राधिकरण कडून कोणत्याही प्रकल्पाची परवानगी नाही. त्याऐवजी वितरित भूखंडाचा वापर करून विक्री करण्यास खाजगी विकासकास परवानगी.
**मोडेल-३:**शासन भूखंड उपलब्ध करून देईल. विकासकाम घरकुल हस्तांतरणावेळीएकरकमीमहासुलऐवजी १५ ते २० वर्षाच्या कालावधीत प्रतीवर्षी महसूल मिळेल.

**मोडेल-४:**वार्षिकी तथाभांडवलप्रदान अनुदानित गृहनिर्माण ४० ते ५०% देयक बांधकाम चालू असताना उर्वरित रक्कम १० वर्षे समान हफ्ता प्रतिवर्षी.

**मोडेल-५:**भूखंडउपलब्ध (प्राधिकरण)-विकासक + थेट आर्थिक संबंध: शासन जमीन + अनुदान उपलब्धी

**मोडेल-६:** प्रत्यक्ष भाडे तत्वावर गृहनिर्माण - घराची मालकी विकासाकडे लाभार्थी घरभाडे अदा करेल. घराची किंमत लाभार्थीकडून वसूल.

**खाजगी जमीन:**

**मोडेल (अ):** कर्जा संबंधित व्याज अनुदानाला सीएलएसएस मधून गृहनिर्माण

**मोडेल (ब):** परवडणार्या घरांचीनिर्मितीकरण्याच्यामाध्यमातूनघरकुलाचीकिंमतसार्वजनिक प्राधिकरण निश्चित करेल. तासेच सार्वजनिक प्राधिकरण लाभार्थी पात्रता निश्चित करून यादी जाहीर करेल.

**सवलती: फक्त इ.डब्ल्यू.एस/ एल.आई.जी**

१) संयुक्त मोजणी शुल्क - ५०% टक्के सूत
२) पहिल्या दस्तासाठी केवळ १००० इतके मुद्रांक शुल्क
३) दि.९/१२/१५ च्या शासन निर्णयानुसार केंद्र+राज्य १+१.५ असे एकूण २.५ लाख अनुदान
४) समाविष्ट गृहप्रकल्पांना २.५ चटइ क्षेत्रफळ निर्देशांक (एफएसआय) अनुदान
५) योजना हरित / ना उपलब्ध विकास क्षेत्रात देखील राबविता येईल. केवळ १ एफेएसआय
६) विकास शुल्क सुट- लवकरच शासनाचा निर्णय येणे अपेक्षित आहे

**निकष: जमिनीची उपलब्धता**

**अ) सार्वजनिक जमिनीवरील प्रतिकृती:**

**१)** निविदा प्रक्रियेद्वारे सहभाग
**२)** उपलब्ध करून दिलेल्या जमिनीवर फक्त इ.डब्ल्यू.एस/ एल.आई.जी लाभार्थीसाठी
**३)** अनुज्ञेय घर्कुलांपैकी ५०% घरकुलाची किंमत म्हाडा च्या धोरणानुसार शासन निश्चित करेल.
**४)** खाजगी विकासक ५०% घरकुले म्हाडा च्या प्रमाणित किंमत धोरणानुसार किंमत निश्चित करून विक्री करण्याची तयारी.

**ब) खाजगी जमिनीवरील प्रतीकृतीसाठी:**

**१)** फक्त इ.डब्ल्यू.एस/ एल.आई.जी घरे बांधणे आवश्यक
२) ५०% घरकुलाची किंमत म्हाडा च्या प्रचलित किमतीनुसार
३) सुयोग्य ठिकाणी विकासक सहभाग नोंदवला जाईल.

पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना, 'सर्वांसाठी घरे' या योजनेचे प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी माननीय पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यन्त ही योजना पोहोचविणे व लाभ मिळवून देणे बाबत पीएमआरडीए तर्फे कालबद्ध कार्यक्रम आखून योजना यशस्वी करण्याचा संकल्प आहे.